RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक २६] मंगळवार, जून १६, २०१५/ज्येष्ठ २६, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ३९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. .. | पृष्ठे १-३ |

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०१५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIV OF 2015.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६४ चा महा. २०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ याच्या कलम १३ मध्ये पोट-कलम (१ब) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६४ चा महा. २०.

" (१क)(अ) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ,—

(एक) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील ; आणि

(दोन) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील,

ज्या, कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्ती असतील.

(ब) खंड (अ) अन्वये नियुक्त केलेल्या विशेष निमंत्रितांना बाजार समितीच्या चर्चांमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु तिच्या सभेमध्ये मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(क) विशेष निमंत्रितांचा पदावधी हा, बाजार समितीच्या सदस्यांच्या पदावधीइतकाच असेल.".

## निवेदन

बाजार क्षेत्रात शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या पणनाचा आणि त्यासाठी राज्यात स्थापन केलेल्या बाजारांचा तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी-ग्राहक बाजारांचा विकास व विनियमन करणे, अशा बाजारांच्या संबंधात स्थापन करावयाच्या किंवा बाजारांशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी कार्य करणाऱ्या बाजार समित्यांना अधिकार प्रदान करणे, यांकरिता महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महा. २०) हा अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमाखाली घटित केलेल्या बाजार समित्यांचे कार्य अधिकाधिक कार्यक्षमतेने व सुरळीतपणे चालावे याची सुनिश्चिती करण्यासाठी, महाराष्ट्र शासनास, कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रांमधील तज्ज्ञ व्यक्तींची बाजार समित्यांवर विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती करणे इष्ट वाटते, जेणेकरून बाजार समित्यांना अशा तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा फायदा करून घेता येईल. तसेच अशा विशेष निमंत्रितांना, बाजार समितीच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल परंतु, त्यांना त्यात मतदान करण्याचा हक्क असणार नाही अशीही तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्या प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ मध्ये एक नवीन पोट-कलम (१क) समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महा. २०) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १२ जून २०१५.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुधीर कुमार गोयल,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.